Volume – XI, Special Issue – I, January – February 2022 ISSN: 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
Peer Reviewed Refereed Journal {Bi-Monthly} Impact Facor : Cosm 5.017

डांग सेवा मंडळ नाशिक संचलित

# दादासाहेब बिडकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,

पेठ, जि. नाशिक - ४२२२०८

## एक दिवशीय राष्ट्रीय परिषद

## “ नाशिक जिल्हयातील स्वातंत्र्य चळवळी ”

२५ फेब्रुवारी २०२२

दादासाहेब बिडकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेठ
आणि इतिहास विभाग, आय.क्यू.ए.सी.विभाग व
सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

परिसंवाद प्रमुख
डॉ. आर. बी. टोचे
प्राचार्य

मुख्य संपादक
डॉ. जी. डी. रुपवते
इतिहास विभाग प्रमुख

ISSN: 2278 – 5639

# Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)

Peer Reviewed Refereed Journal
{Bi-Monthly}

Impact Facor : Cosm 5.017

Volume – XI, Special Issue – I, January – February 2022

**Dr. R. B. Toche**
**(Principal, Conference Director)**

**Dr. G. D. Rupwate**
**(Convener, Chief Editor)**

**Prof. P. B. Nikam**
**(Co-ordinator, Assistant Editor)**

**Dr. P. V. Deshpande**
**(Assistant Editor)**

**Prof. V. P. Bhoye**
**(Assistant Editor)**

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# INDEX



| Sr. No. | Author Name | Title | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | प्रा. डॉ. जी. डी. रूपवते<br>प्रा. डॉ. प्रदीप विष्णु देशपांडे | पेठ तालुका सामाजिक, राजकीय, भौगोलिक व ऐतिहासिक दृष्टिक्षेप | 01 to 03 |
| 2. | Asst. Prof. Ganesh Uttam More | DADASAHEB BIDKAR, THE UNIQUE FREEDOM FIGHTER IN NASHIK DISRTICT | 04 to 09 |
| 3. | Dr. D. J. Nerpagar | THE MARGINALIZED FEMININE ANGUISH IN ARUNDHATI ROY'S "THE GOD OF SMALL THINGS" | 10 to 15 |
| 4. | डॉ. संतोष दत्तात्रय बोडके | भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील नाशिक जिल्ह्याचे योगदान | 16 to 55 |
| 5. | डॉ. श्रीहरी रामचंद्र थोरवत | शरद पाटील यांचा माफुआ विचारप्रवाह : आदिवासींच्या सामाजिक व ग्रामीण चौकटीचा अभ्यास | 56 to 62 |
| 6. | प्रो (डॉ). वाय. एम. साळुंके | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नाशिक जिल्हयातील स्नेहयात्री दादासाहेब बिडकर आणि दादासाहेब पोतनीस | 63 to 70 |
| 7. | डॉ. एम. आर. थोरात | नाशिक शहराच्या विशेष संदर्भात स्थानिक इतिहास लेखनाची आवश्यकता | 71 to 75 |
| 8. | प्रा. डॉ. जी. डी. रूपवते | स्वातंत्र्यसेनानी दादासाहेब बिडकर यांचे शैक्षणिक कार्यातील योगदान | 76 to 82 |
| 9. | प्रा. थविल कलावती जयवंत | नाशिक जिल्हयातील समाजसुधारकांनी वंचित घटकांसाठी केलेले कार्य | 83 to 86 |
| 10. | प्रा. डॉ. प्रदीप विष्णु देशपांडे | पेठ सुरगाण्याचे झुंजार आदिवासी नेतृत्व (स्वातंत्र्य सैनिक श्री. सितारामजी भोये) | 87 to 93 |
| 11. | Prof. Phapale Anita Shankar | DEPRIVED FACTOR: DIFFERENTLY ABLED | 94 to 98 |
| 12. | प्रा. एकनाथ आहेर | २० शतकातील नाशिक जिल्यातील एक बहुआयामी व्यक्तिमत्व: आवारी गुरुजी | 99 to 104 |

| | | | |
|---|---|---|---|
| 13. | प्रा. सुभाष किसन पवार | विसाव्या शतकातील आदिवासींची राजकीय चळवळ | 105 to 110 |
| 14. | प्रा. हेमलता कृष्णा महाले | २० व्या शतकातील नाशिक जिल्हयातील कामगार चळवळी आणि सक्षमीकरण | 111 to 115 |
| 15. | प्रा. देशमुख उमा प्रकाश | नाशिक जिल्हयातील शेती क्षेत्रात झालेले आर्थिक परिवर्तन | 116 to 119 |
| 16. | प्रा. अनिता दिलीप कोळी | नाशिक जिल्हयातील स्वातंत्र्य काळातील दलित साहित्यिक | 120 to 123 |
| 17. | प्रा. डॉ. रवींद्र मु. पगार | निःस्पृह समाजसेवक कर्मवीर दादासाहेब बिडकर | 124 to 12[illegible] |
| 18. | प्रा. अजय एकनाथ अहिर | स्वातंत्र्य चळवळीत येवला तालुक्याचे योगदान | 129 to 133 |
| 19. | प्रा.योगिता रविंद्र मठपती | वंचित घटकांचा साम्यवादी आणि मार्क्सवादी विचार – एक अभ्यास | 134 to 139 |
| 20. | प्रा. चंद्रप्रकाश गंगाराम कांबळे<br>प्रा. डॉ. दिपक सोपान वेडे | नाशिक जिल्हयातील १९४२ चे आंदोलन आणि वसंतराव नारायणराव नाईक | 140 to 143 |
| 21. | प्रा. छाया भावलाल सैंदाणे | 20 व्या शतकातील वंचितांची सामाजिक परिस्थिती | 144 to 146 |
| 22. | प्रा. बागुल एल के. | 20 व्या शतकातील स्त्रीयांची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थिती व जागृती. | 147 to 150 |
| 23. | डॉ. देवीदास आनंदा सोनवणे | आदिवासींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणाऱ्या पदमश्री अनुताई वाघ | 151 to 154 |
| 24. | प्रा. डॉ. खैरनार कैलास कारभारी | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत नाशिक जिल्ह्यातील स्त्रियांचा सहभाग | 155 to 158 |
| 25. | डॉ.रामदास भोंग | नाशिक मधील १९४२ची चलेजाव चळवळ ( विशेष संदर्भ : दत्तात्रय मल्हारराव बिडकर ) | 159 to 164 |
| 26. | Mr. Udhav Kalu Kudase | WORKERS MOVEMENT | 165 to 169 |
| 27. | प्रा. दिनेश दौलत हळदे | नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागात शिक्षण चळवळीचे प्रणेते - कर्मवीर दादासाहेब बिडकर | 170 to 173 |

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नाशिक जिल्ह्यातील स्नेहयात्री दादासाहेब बिडकर आणि दादासाहेब पोतनीस

**प्रो (डॉ). वाय. एम. साळुंके**
*म.वि.प्र.समजाचे, कर्मवीर रावसाहेब थोरात*
*कला आणि वाणिज्य महाविद्यालय,*
*वणी, ता. दिंडोरी, जि.नाशिक , महाराष्ट्र.*

---

**प्रास्तविक**

स्थानिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहासाची बांधणी होत असते. म्हणून स्थानिक इतिहासाचे स्थान राष्ट्राच्या इतिहासात महत्वपूर्ण असते .आपण भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास भारतीय राष्ट्रीय सभा अंतर्गत मावळ,जहाल ,गांधी युग असे करत असतो.तसेच विविध संघटना ,वेगवेगळया विचाराच्या चळवळी या विविध अंगाने झालेली राष्ट्रीय चळवळ असा भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अभ्यास होत असतो. अशा भारतीय स्वातंत्र चळवळीत भारतीय राष्ट्रीय कांग्रेसची भूमिका महत्वपूर्ण ठरली आहे . स्वातंत्र्यपूर्वीचा नाशिक जिल्हा हा भारतीय स्वातंत्र चळवळीतील योगदानात महत्वपूर्ण होता.अशा नाशिक जिल्ह्यात भारतीय स्वातंत्र चळवळीतील सर्वच विचारसरणीने भाग घेतल्याचे दिसते.त्यातील एक विचारसरणी म्हणजे गांधी विचारसरणी होय. नाशिक जिल्ह्याला या गांधी विचारसरणीने फक्त स्वातंत्रसेनानी दिले नाही तर परिपूर्ण असे सामाजिक,राजकीय,सहकार,ग्रामीण, आदिवासी, शैक्षणिक क्षेत्रात निस्वार्थी काम करणारे ऋषीतुल्य नेतृत्व दिले.अशा नेतृत्वापैकी एक म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील, म.गांधी आणि सर्वोदयी नेते आचार्य विंनोबा भावे यांच्या विचारांने प्रेरित नाशिक जिल्ह्यातील स्नेहयात्री मा.श्री दत्तात्रेय (दादासाहेब) मल्हार बिडकर आणि दत्तात्रेय (दादासाहेब) शंकर पोतनीस होय. प्रस्तुत लेखात या स्नेहयात्रींच्या नाशिकमधील भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील या स्नेहयात्रींच्या सहवासाच्या कार्याचा धांडोळा घेतला आहे.

**सविनय कायदेभंग चळवळ आणि चरखा केंद्र**

गोविंदभाई श्रॉफ , अच्युतभाई देशपांडे व नारायणराव चव्हाण असे अनेकजण हैदराबादहून इ.स. १९३० मध्ये सत्याग्रहात भाग घ्यावयाचा म्हणून मुंबईस नवजीवन संघात आले त्यांच्या बरोबर दादासाहेब बिडकर पण होते . त्यावेळी सरोजिनी नायडूंची कन्या पद्मजा नायडू यांनी या सर्वांना

मुंबईला नवजीवन संघाचे सेक्रेटरी श्रीलाल भट यांच्यासाठी पत्र दिले . त्यानुसार हे सर्व सत्याग्रह शिबिरात दाखल झाले .याचवेळी पुण्याहून जे सत्याग्रही तेथे आले होते , त्या समूहामध्ये मध्ये दादासाहेब पोतनीसही आले होते .या सविनय कायदेभंग चळवळ काळात रोज पहाटे प्रभातफेरी निघत होती, दुपारी चरख्यावर सूत कातण्याचे शिक्षण दिले जात होते. परंतु पुढे इ.स. १९३० चा सत्याग्रह व म. गांधी – लॉर्ड आयर्विन समझोता झाला. सविनय कायदेभंग चळवळ सत्याग्रह स्थगित केली गेली.समजोता कराराप्रमाणे ब्रिटिशांनी सर्व सत्याग्रंहिची कारागृहातून सुटका केली . काही सत्याग्रही परत घरी गेले. काही सत्याग्रही ज्यात अच्युतभाई देशपांडे, दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस यांनी परत घरी न जाता विधायक कामात राहावयाचे ठरवले . नवजीवन संघाने नाशिक व पुणे येथे चरखा वर्ग सुरू केले. त्यात दादासाहेब पोतनीस नाशिकला आले तर दादासाहेब बिडकर पुण्यास बाळूकाका कानिटकर यांच्याकडे चरखा वर्ग सुरू करण्यास गेले .नाशिकला पोतनीस यांनी काकासाहेब गद्रे यांच्या जुन्या घरी रविवार पेठेत चरखा वर्ग सुरू केला . नाशिकमधील अनेक तरुण - तरुणी चरखा वर्गात दाखल झाले. देशभक्तीपर वाङ्मयाचे एक वाचनालय सुरु करण्यात आले. नाशिकमध्ये प्रभातफेरी सुरू केली. सामुदायिक गीते व छोटी छोटी देशभक्तीपर व्याख्याने सुरू केली. पुढे दादासाहेब बिडकर पुण्यातील चरख्यावरील कताई शिक्षणाचे काम आटोपून नाशिकला आले. परंतु यावेळी नाशिकचे चरखा केंद्र बंद करावे लागले होते कारण ब्रिटीश सी.आय.डी.अधिकाऱ्यांनी काकासाहेब गद्रे यांना हे केंद्र बंद करण्याबद्दल सूचना दिली. गांधी विचाराने प्रेरित दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस या स्नेहयात्रींनी स्वदेशी सूत्राचे चरखा केंद्र मूळ्य बंद पडू दिले नाही. नंतर मनमाडला मामा नाईक यांच्या राममंदिरात चरखा केंद्र सुरू केले .नाशिक जिल्ह्यातील मनमाड परिसरातील अनेक तरुण - तरुणी या चरखा वर्गात दाखल झाले .नाशिक प्रमाणेच प्रभातफेरी, वाचनालय, देशभक्तीपर समूहगीते हे कार्यक्रम चालू ठेवले. मनमाडच्या आसपासच्या गावातही स्वातंत्र चळवळ व कॉंग्रेस विचार प्रचाराचे कार्य सुरू केले.

**ग्रामसेवेतून गांधी विचार प्रसार**

नाशिक जवळील येवले येथे आपटे गुरुजींनी राष्ट्रीय शाळा अनेक वर्षे चालवली होती. दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस येवले येथे जाऊन आपटे गुरुजींना भेटले. इ.स. १९३० च्या चळवळीत शाळेतील अनेक शिक्षकांना कारागृहात टाकले. त्यामुळे ही शाळा बंद होती. आपटे गुरुजींना दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस भेटले आम्हाला ग्रामसेवेचे काम करावयाचे आहे, आपण आम्हाला

GOEIIRJ

मार्गदर्शन करावे व एखादे चांगले गाव निवडून आमची तेथे व्यवस्था करावी अशी विनंती केली असता,यावेळी या दोन्ही स्नेहयात्रींना आपटे गुरजींनी बागलाणमधील नामपूरचे गांधी विचाराचे, इ.स. १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतलेले व कारागृहातून नुकतेच सुटलेले स्वातंत्रसैनिक, मोठे शेतकरी व सावकार नरहरशेठ वाणी यांना भेटण्यास सांगितले. त्यांना तेथे कार्य करण्यासाठी कार्यकर्त्यांची गरज आहे, असे सांगून नरहरशेठ यांच्या नावाने आपटे गुरजींनी एक पत्र दिले. ते पत्र घेऊन दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस हे दोघे येवल्याहून नामपूरला पायी जाण्यास निघाले . येवला ते नामपूर हे जवळजवळ ८०किलोमीटर अंतर २ दिवसात पार करून नामपूरला हे स्नेहयात्री पोहोचले . आपटे गुरुजींचे पत्र त्यांना दिले. त्यांनी एकदा आमच्याकडे निरखून पाहिले व आस्थेने चौकशी केली . पायी आलो हे सांगितले असता. त्यांना नवल वाटले . विश्रांती घेण्यास सुचवले. रात्री जेवण झाल्यावर या दोन्ही स्नेहयात्रीकडून सर्व हकिगत ऐकून घेतली. दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस यांची ग्रामसेवेची तळमळ पाहून नरहरशेठ यांनी टेंभे या गावी पाठवले. तेथील आपले घर देऊन सर्व व्यवस्था केली. नरहरशेठ यांनी टेंभे येथील आपल्या जुन्या घराची किल्ली या स्नेहयात्रींना दिली . प्रवासातील बैलगाडीत अंथरूण पांघरूण , काही भांडी व सर्व प्रकारचे धान्य या स्नेहयात्रींना दिले टेंभे गावातील पोलिस पाटील सजन राघो पाटील हे स्वातंत्र्यसैनिक आपल्याला मदत करतील. त्यांच्या सल्ल्याने पुढील कार्यक्रम करावा असे सांगितले. दुसऱ्या दिवशी बैलगाडीतून टेंभे या गावी स्नेहयात्री पोहचले . सजन राघो पाटील यांना दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस भेटले. त्यांच्याकडे ग्रामसेवा विषयी विचारविनिमय सुरु झाला. लवकरच या कामात दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस अच्युतभाई देशपांडे दांडेकर हे येऊन मिळाले. या गांधी विचाराच्या कार्यकर्त्यांनी ते जुनाट घर सारवून, लिंपून स्वच्छ करून घेतले . पांढरा चुन्याचा रंग दिला . मागची पुढची जागा साफ केली . टेंभे गावातील स्त्री - पुरुष व तरुण मंडळी आश्चर्याने पाहात होती. हे काम करण्यासाठी या स्नेहयात्रींनी गावाकडे मदत मागितली नाही. पुढे आसपासच्या गावात जाऊन ओळखी करून घेतल्या .यावेळी या स्नेहयात्रींचे एकच ध्येय होते ते म्हणजे राष्ट्रीय शाळेद्वारे राष्ट्र जागृती व ग्रामसेवा करणे होय.

**सविनय कायदेभंग चळवळ दुसरे पर्व आणि स्नेहयात्रींना आचार्य विनोबा भावेंचा सहवास**

दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस यांचे सजन पाटील यांच्या बरोबर काँग्रेस विचाराचा प्रचार व समूहगीते हे कार्यक्रम जोमाने चालू होते. दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस,सजन पाटील यांनी निरनिराळया गावात राष्ट्रीय शाळा सुरू केल्या. काही गावात तरुण मंडळे, व्यायामाचे वर्ग ,छोटे मोठे उत्सव सुरू करून याद्वारे गांधी विचार व काँग्रेसचे महत्त्व स्नेहयात्रीं सांगत होते. समूहगीताद्वारे

ब्रिटीश अन्यायाविरुद्ध स्वातंत्र जनतेत निर्माण केली.या सर्व घडामोडींवर ब्रिटीश पोलिसांचे लक्ष होतेच. म.गांधी लंडनवरून दुसऱ्या गोलमेज परिषदेतून निराशाने भारतात आले .म.गांधीनी कॉंग्रेसी कार्यकर्त्यांना भावी लढ्याविषयी विषयी मार्गदर्शन करण्यास सुरवात केली यावेळी ब्रिटीशांनी दडपशाही सुरु केली.खास वटहुकुम काढून लोकांवर अत्याचार सुरु केले लॉर्ड विलिंग्टन याने राष्ट्रसभेची चळवळ दडपशाहीने नष्ट करता येईल असे त्याला वाटत होते म्हणून गांधीजी इंग्लंडहून भारतात येण्याच्या अगोदर पं .जवाहरलाल नेहरूंना इ.स. १९३२ मध्ये अटक झाली होती.म.गांधीनी ३ जानेवारी इ.स. १९३२ ला सविनय कायदेभंग चळवळ दुसरे पर्व सुरु करण्याचे अह्वान केले. त्यानंतर ४ जानेवारीला म. गांधी, सरदार पटेल व इतर नेत्यांना अटक करून पुणे येथे येरवडा कारागृहात ठेवले.

ब्रिटिशांनी याचप्रमाणे ठीकठिकाणी कॉंग्रेसी कार्यकर्त्यांची धरपकड सुरु केली. इ.स.१९३२ मध्येच दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस, अच्युतभाई देशपांडे यांना अटक झाली . या सर्वांना धुळे येथील कारागृहात ठेवले .या धुळे कारागृहात आश्चर्याची बाब म्हणजे विनोबाजी ,जमनालाल बजाज , मणिभाई कोठारी , साने गुरुजी , बाळूभाई मेहता , देवकीनंदन नारायण , आण्णासाहेब दास्तानेही सर्व वरिष्ठ मंडळी आधीच तेथे होती . इ.स. १९३२च्या काळात विनोबाजींची माहिती फार जणांना नव्हती. या वरिष्ठ मंडळींना कारागृहात ब वर्ग दिला होता . बाकी सर्व वर्गात क होते. परंतु विनोबाजींनी ब वर्ग न स्वीकारता क वर्गच पसंत केला . कारागृहामध्ये विहिरीचे पाणी मोटेने ओढणे, जात्यावर धान्य दळणे , विणकाम , शेतीकाम , खडी फोडणे ही कामें होती . दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस, अच्युतभाई देशपांडे यांना दळणाचे, पाणी ओढणे काम दिले होते . इ.स. १९३२ मध्ये धुळे कारागृहामध्ये विनोबाजींची गीतेवरील प्रवचने दर रविवारी होत असत . सर्व कैदी राजकीय कैदी प्रवचनास हजर असत . साने गुरुजी प्रवचनाचे टिपण करीत होते .याकाळात विनोबांच्या सहवासात दादासाहेब पोतनीस कारागृहामध्येच आले . त्यांचे वैयक्तिक संबंधही वाढले .तर दादासाहेब बिडकर वेगळया बराकीत असल्याने दादासाहेब पोतनीस यांच्याशी रविवार सोडून सविस्तर भेट होत नव्हती . फक्त रोजच्या कामाच्या ठिकाणीही भेट होत असे . दादासाहेब पोतनीस विनोबांच्या विशेष परिचयात आले.कारागृहात राजकीय कैदीमध्ये काही कुरबुरी झाल्यास विनोबाजी त्या मिटविण्यासाठी दादासाहेब पोतनीस यांना सांगत असत . विनोबाजींनी पोतनीसांचे नाव डी.एस.पी.असे ठेवले होते . राजकीय कैदींचे काही काम निघाले , काही अडचण असली तर विनोबाजी डी.एस.पीं.च्याकडे पाठवीत . त्यामुळे सर्व राजबंद्यांमध्ये पोतनीस डी.एस.पी. म्हणूनच परिचित झाले .पुढे विनोबाजी सुटून वर्ध्यास गेले . दादासाहेब पोतनीस व अच्युतभाई कारागृहातून सुटल्यानंतर काही दिवस विनोबाजींकडे आश्रमात गेले . तर दादासाहेब

GOEIIRJ

बिडकर यांना विसापूरला जेलमध्ये पाठवण्यात आले . पुढे इ.स. १९३३ मध्ये कारागृहातून सुटले.

**खादी भांडार आणि चरखा वर्गाची स्थापना**

इ.स. १९३३ मध्ये कारागृहातून सुटल्यावर काही दिवसांनी दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस परत नामपूरला आले. आता नामपूर येथे न राहाता सटाणे येथे राहावयाचे असे ठरवून तेथे राहण्यास आलो . दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस या मंडळीना गावात जागा मिळू नये , असा प्रयत्न तेथील पोलिस पाटील अभिमन नानाजी यांनी केला . मात्र पुढे त्यांनीच एक खोली मिळवून दिली .सटाण्यात प्रभातफेरी, मुलांना एकत्र गोष्टी सांगणे , गाणी म्हणून घेणे , थोरांची चरित्रे सांगणे ही कामे स्नेहयात्रींनी सुरू केली . सटाणे येथे खादी भांडार आणि चरखा वर्गही सुरू केला संपर्क वाढत गेला . दादासाहेब पोतनीस मालेगाव तालुक्यात कामास गेले . बाळूभाई मेहेता यांच्याकडे अच्युतभाई मदतनीस म्हणून कासारे , ता . साक्री येथे गेले. इ.स. १९३४ मध्ये दादासाहेब पोतनीस बिहार भूकंपात मदत करण्यासाठी स्वयंसेवक म्हणून गेले. त्यावेळी त्यांच्याबरोबर दादासाहेब बिडकर यांनी वसंतराव नाईक यांनाही नेले होते . दादासाहेब पोतनीस यांनी मालेगाव येथे थांबून मालेगाव तालुक्यातील गावोगाव फिरून ज्या गावी शाळा नव्हती तेथे ग्रामीण शाळा सुरू केल्या . मालेगाव तालुका शिक्षण प्रसार मंडळ ही संस्था स्थापन करून सर्व शाळा या संस्थेमार्फत चालत असत . सरकारी अनुदान नव्हते . गावकरीच सर्व व्यवस्था करीत असत . पाचवी सहावीपर्यंत शिकलेले तरुण शाळा चालवित असत . जनता संपर्क वाढला . त्यामुळे त्यांनी मालेगाव येथे दादासाहेब पोतनीस गांवकरी हे साप्ताहिक सुरू केले . त्यावेळी म्हणजे इ.स.१९३६-३७ साली नाशिक जिल्ह्यात कोणतेही साप्ताहिक किंवा दैनिक वृत्तपत्र नव्हते . गांवकरी साप्ताहिक लोकप्रिय करण्यासाठी दादासाहेबांनी प्रयत्न केले .बिहारमधून परतल्यानंतर दादासाहेब बिडकर सटाण्यात परत आले . मलेरियाने आजारी झाल्याने दादासाहेब बिडकर यांना सटाणे येथून वर्धा येथे विनोबाजींच्या आश्रमात नेले . आश्रमात काही दिवस राहून नंतर दादासाहेब बिडकर गांधी सेवा संघाचे चिटणीस भाईसाहेब धोत्रे यांच्याकडे राहिलो . बरा झाल्यानंतर परत सटाण्यास आले . भाईसाहेब धोत्रे यांच्यामुळे दादासाहेब बिडकर यांचा अनेक थोर मंडळींशी परिचय झाला .

इ.स.१९३५ मध्ये दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस गांधी सेवा संघाचे सभासद करून घेण्यात आले होते . दादासाहेब पोतनीस मालेगाव येथे काही काळ राहिले साप्ताहिक गांवकरी चांगला चालू झाला .यावेळी दादासाहेब पोतनीस मालेगावी तर दादासाहेब बिडकर सटाण्यास होते.असे असले तरी दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस या स्नेहयात्रींचा सतत संपर्क असे .या काळात साप्ताहिक गांवकरी दादासाहेब बिडकर सटाण्यात व इतर गावातही विकत होते . साप्ताहिक गांवकरी बातम्या

पाठवीत होते . दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस दोघेही कॉंग्रेसचे कार्यही करीत होतो . या स्नेहयात्रींनी मालेगाव व बागलाण तालुक्यात तालुका कॉंग्रेस कमिट्या स्थापन केल्या . इ.स. १९३६ मध्ये फैजपूर येथे अखिल भारतीय कॉंग्रेसचे अधिवेशन झाले . तेव्हा दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस एक महिनाभर फैजपूर येथे होते. इ.स.१९३७ मध्ये असेम्ब्लीच्या निवडणुकी झाल्या . मालेगाव विभागात भाऊसाहेब हिरे, लालचंद हिराचंद व सजन राघो पाटील असे ३ जण कॉंग्रेसचे उमेदवार होते . भाऊसाहेब हिरे व लालचंद हिराचंद निवडून आले . सजन राघो पाटील हे पराभूत झाले . ही निवडणूक प्रचाराची जबाबदारी कॉंग्रेस कमिटीने दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस यांच्यावर सोपवली होती . इ.स.१९३७ मध्ये मुंबई राज्यात व इतरत्र सर्वच राज्यात कॉंग्रेसची मंत्रिमंडळे आली होती.

**डांग सेवा मंडळ**

साप्ताहिक गांवकरी दैनिक झाल्यानंतर दादासाहेब पोतनीस नंतर गांवकरी नाशिकहून प्रसिध्द करू लागले. दादासाहेब बिडकर यांनी इ.स.१९३७ मध्ये आदिवासींमध्ये काम करण्याचे ठरवून डांग सेवा मंडळ ही संस्था स्थापन करून कामास सुरुवात केली.डांग सेवा मंडळ स्थापन करण्यात दादासाहेब पोतनीस यांचा सहभाग होता . दादासाहेब पोतनीसांनी कष्टाने वृत्तपत्र व्यवसायास सुरुवात केली. दैनिक गांवकरी जरी कॉंग्रेसप्रेमी वृत्तपत्र होते तरी कॉंग्रेसने हे आपले पत्र आहे , असे मानले नाही व मदतही केली नव्हती. इ.स.१९४२ मध्ये दादासाहेब पोतनीस मुंबईस कॉंग्रेस अधिविशनास गेले. अधिवेशनाहून परत आलेल्या सर्व कॉंग्रेस कार्यकर्त्यांना नाशिकरोड स्टेशनवरच अटक होऊन त्यांना नाशिकरोड कारागृहात ठेवले. दादासाहेब बिडकर यांच्यावरही पकड वॉरंट होते.यावेळी दादासाहेब बिडकर सटाण्यात होते. त्यांनी दोन महिने भूमिगत राहून राष्ट्रीय चळवळीचे विचार मार्गदर्शन ग्रामीण भागात करत होते. शेवटी ब्रिटीश पोलीसांनी दादासाहेब बिडकर यानाही अटक करून नाशिकरोड कारागृहात ठेवले .त्यांना सब डिव्हिजनल मॅजिस्ट्रेटनी २ वर्षांची शिक्षा ठोठवून दादासाहेब बिडकर यांची रवानगी धुळे कारागृहात केली दादासाहेब पोतनीस कारागृहात असल्याने इ.स. १९४२ ते १९४४ या कालावधीत गांवकरी बंद होता.

दादासाहेब पोतनीस इ.स. १९४४ मध्ये सुटले दैनिक गांवकरी पूर्ववत सुरू झाला. दैनिक गांवकरीचे काम दिवसेंदिवस वाढत गेले. दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस हे सतत नाशिक जिल्ह्याच्या विकासासाठी काही करता येईल हा विचार करत , विनोबाजी , गांधीजी यांच्या विचारांचा पगडा त्यांच्या स्वभावात व आचरणात होता .विधायक कार्य करत असतांना दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस या दोघांचे विचार काही बाबतीत भिन्न असत . पण दोघांनी आपापले विचार एकमेकांवर लादले

नाहीत .

आर्थिक,सामाजिक व इतर अडीअडचणींच्या प्रसंगी दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस एकमेकाला सावरूनच घेत गेले . सर्व विचारात विधायक दृष्टीच होती . दादासाहेब बिडकर दैनिक गांवकरीच्या स्नेहयात्री या स्मृती ग्रंथात म्हणतात "दादासाहेब पोतनीस यांचा संतवाङ्मयाचा अभ्यासही बराच होता.गीता,ज्ञानेश्वरी, उपनिषदातील उतारे व उदाहरणे सतत देत असत . त्यामुळे रामदास सेवा मंडळ , संत भारती , गणेशोत्सव मंडळ या संस्थांमधून सद्विचार व सदाचार प्रचाराचे वातावरण निर्माण करण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे. नाशिक सहकारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी त्यांनी फार प्रयत्न केले. नाशिक सहकारी साखर कारखानाचे ते शमसन नियुक्त संचालक मंडळाचे ते अध्यक्ष होते . नाशिक औद्योगिक वसाहत व नाशिक मर्चंट बँक स्थापण्यासाठी त्यांनी अतोनात प्रयत्न केले व या संस्था नावारूपास आणल्या . नाशिक सहकारी ग्राहक भांडाराची त्यांनी स्थापना केली . नाशिकच्या व नाशिक जिल्हयाच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न अवर्णनीय आहेत , हे विसरून चालणार नाही .उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व्हावे , यासाठी त्यांनी प्रयत्न केले . उत्तर महाराष्ट्रांत,धुळे , जळगाव , अहमदनगर येथेही गांवकरी स्वतंत्र रितीने चालत आहे . पोतनीसांच्या या वाटचालीत मी त्यांचे बोट धरूनच चाललो"

जीवनातील अनेक प्रसंगाते इ.स. १९३० साली धरलेली रलेली संगत दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस यांनी कधी सोडली नाही . अनेक बाबतीत निराळे विचार असणारे दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस एकत्र राहिले, व आपापले जीवन संपन्न केले . नासलेल्या राजकारणात आपले विचार व आचार व शुध्द ठेवूनच ते कसे वागावे याचे स्वरूप म्हणजे दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस हे स्नेह्यात्री होय. दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस या स्नेहयात्रींमुळे दिनदुबळे,ग्रामीण,आदिवासी जनतेची जीवने संपन्न झाली. दादासाहेब पोतनीस यांचा जन्म २२ नोव्हेंबर इ.स. १९०९ चा तर दादासाहेब बिडकर यांचा जन्म १९ मार्च इ.स. १९१० चा म्हणजे दोन्ही स्नेहयात्री तसे समवयस्क समजले पाहिजे.जसे दोन्ही स्नेहयात्री समवयस्क होते तसे समविचारी रंजल्या गांजल्या सामन्य जनतेचे कनवाळू होते. दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस स्वातंत्र्यसेनानी, ,योगाभ्यासी, निष्ठावान गांधीवादी अशा दोन्ही स्नेहयात्री दादासाहेबांचे ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व सुंदर व मोहक दीपस्तंभ भावी पिढीला मार्गदर्शक आहे.

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XI Special Issue – I January – February 2022

संदर्भ साधने

१ जोशी लक्ष्मणशास्त्री (प्र.संपा), मराठी विश्वकोश खंड १२, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,मुंबई ,१९८५.

२ पोतनीस वंदनराव (संपा), स्नेहयात्रा ,गांवकरी भवन, नाशिक, १९९८.

३ जायखेडकर विनय (मुलाखतकार), स्वातंत्र्यसेनानी दादासाहेब बिडकर व दादासाहेब पोतनीस यांची मुलाखत, आकाशवाणी, नाशिक,१९९८.

GoEIIRJ